**तक्रार (यु.एल.पी.) क्र.९/२०११**
**निशाणी सी–३६**
**पान क्र.८, परिच्छेद क्र.१२.**

१२. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचून पाहिले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.सी–३६ देण्यात येते.

**<u>उलटतपास –तक्रारदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. राणे.</u>**

१३. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याच्या वतीने साक्ष देण्यासाठी मला लेखी स्वरुपात अधिकार देण्यात आलेले नाहीत. मी सन २०१६ पासून जाबदार कारखान्यात काम करत असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, तो मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रात कारखान्याकडे सध्या प्रशासन विभागात सन २०१६ पासून सेवेमध्ये आहे असे खोटे लिहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सध्या जाबदार कारखान्याकडे तक्रारदार यांच्या चौकशीची कागदपत्रे नाहीत. सदर प्रकरणात कारखान्याच्या वतीने एकूण किती कागदपत्रे दाखल आहेत त्याची संख्या मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात कारखान्याच्या वतीने किती वेळा चौकशी संदर्भाची कागदपत्रे दाखल करण्यात आली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर शपथपत्रातील सर्व मजकूर कारखान्याच्या वकील साहेबांनी लिहून तयार केला, मी वाचून पाहिला व त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे कारखान्यात सेवेत असताना कोठे

राहात होते व सेवानिवृत्ती नंतर कोठे राहात होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे कारखान्यात कामावर असताना नेमके कोणते काम करत होते याबाबत मला माहिती नाही. मला सध्या वेतन कारखाना व्यवस्थापन देत आहे. मला कामकाज कारखाना व्यवस्थापन पुरवत आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये कारखान्यात सध्या वाहने कार्यरत नसल्याचे व वाहन विभाग अस्तीत्वात नसल्याचे खोटे लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ९ मधील अधोरेखांकीत भाग 'अ' हा खोटा व चुकीचा लिहिला आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांनी कारखान्याच्या विरुध्द या तक्रारीमध्ये कोणते आरोप केले आहेत याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तकारदार यांचेविरुध्द किती रक्कमेचा गैरव्यवहार केल्याचा आरोप ठेवला आहे याबाबत मला माहिती नाही. तक्रारदार यांना कारखान्याच्या सेवेतून मिळणाऱ्या वेतनाशिवाय व फायदयाशिवाय इतर कोणत्याही स्वरुपाचे फायदे किंवा लाभ तक्रारदार यांना मिळालेले नाहीत, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांना कोणत्या नियमाप्रमाणे शिक्षा देण्यात आली आहे याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये तक्रारदार यांना देण्यात आलेली शिक्षा योग्य व बरोबर असल्याचे खोटे लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार हे या न्यायालयाकडून मागणी केल्याप्रमाणे अनुतोष मिळणेस पात्र आहेत. हे म्हणणे खरे नाही

की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामधील कथनांच्या पुष्ठयर्थ माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कारखान्याला मदत व्हावी म्हणून खोटी साक्ष दिली आहे व पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**
**(सैफुद्दीन बा. शेख)**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, सांगली.**

**सांगली.**
**दि. ०५/१२/२०२३.**